② केशवानंद भारती खटला (१९७३) केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य सरकार
अगोदरचे मत नाकारले.
सरनामा हा राज्यघटनेचा भाग आहे असे म्हटले.

③ भारतीय जीवन बीमा निगम खटला (१९९५) विरुद्ध कंझ्युमर एज्युकेशन व रिसर्च सेंटर
सरनामा हा राज्यघटनेचा एक भाग आहे असे म्हटले.

सरनाम्यात दुरुस्ती करता येते का ?

कलम ३६८ अंतर्गत दुरुस्ती करता येते का हा प्रश्न केशवानंद भारती खटल्यात उपस्थित झाला. त्यावेळी सरनामा हा घटनेचा भाग असल्याने दुरुस्ती करता येईल पण घटनेची मुलभूत चौकट किंवा मुलभूत संरचना बदलता येणार नाही. म्हणजेच ३६८ अंतर्गत मुळ वैशिष्ट्ये किंवा मूळ घटक बदलता येणार नाही.

## घटक ५ - संघ आणि त्याचे क्षेत्र

⇒ राज्यघटनेतील कलम १ ते कलम ४ ही संघ व त्याचे क्षेत्र यांच्याशी संबंधित.

कलम १ - इंडिया म्हणजेच भारत राज्यांचा संघ असेल.
म्हणजेच देशालाही इंडिया व भारत ही दोन्ही नावे स्विकारली.
तसेच संघराज्य शब्दाचा उल्लेख न करता राज्यांचा संघ असे म्हटले आहे.

राज्यांचा संघ म्हणण्यामागे दोन कारणे.
① अमेरिकी संघराज्याप्रमाणे भारत हा राज्यांतील करारानुसार बनलेला नाही.
② भारतात राज्यांना संघराज्यापासून वेगळे होण्याचा अधिकार नाही.

या कलम १ अनुसार भारताच्या क्षेत्राचे ३ प्रकारात वर्गीकरण :
① राज्यांची क्षेत्रे
② संघराज्य प्रदेश
③ भारत - कालौघात मिळविलेली क्षेत्रे.

⇒ घटनेच्या परिशिष्ट १ मध्ये राज्यांची व संघराज्य प्रदेशांची नावे व त्यांचा क्षेत्रीय विस्तार दिला आहे.
राज्यासंबंधीच्या घटनेतील तरतुदी जम्मू व काश्मीरला लागू होत नाही.

⇒ राज्यांचा संघ यामध्ये फक्त राज्यांचा समावेश तर
भारताच्या क्षेत्रात राज्यांबरोबरच, संघराज्य प्रदेश व भविष्यात सरकार मिळविल त्या क्षेत्राचा समावेश
म्हणून भारताचे क्षेत्र ही संज्ञा राज्यांचा संघ यापेक्षा व्यापक.
राज्ये ही संघराज्यीय प्रणालीची सदस्य असतात - अधिकार विभागलेले असतात - केंद्र व राज्य
मात्र संघराज्य प्रदेश किंवा भविष्यातील प्रदेश संघराज्यीय प्रणालीची सदस्य नसतात कारण
ती थेट केंद्राकडून प्रशासित होतात.

Scanned by CamScanner

## न्याय :

* न्याय 3 प्रकारचे : 1) सामाजिक 2) आर्थिक 3) राजकीय

सामाजिक → कोणताही सामाजिक भेदभाव न करता समान वागणूक } वितरणीय न्याय सूचित
आर्थिक → आर्थिक घटकांच्या आधारावर भेदभाव न करणे }
राजकीय → समान राजकीय अधिकार

हे न्यायाचे आदर्श रशियन क्रांतीतून (1917) घेतले आहेत.

## स्वातंत्र्य

* स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीच्या व्यवहारावर नियंत्रण नसणे, प्रत्येकाच्या व्यक्तिमत्व विकासाला संधी देणे.
* विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांच्या स्वातंत्र्याची शाश्वती.
* सरनाम्यातील स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व हे आदर्श फ्रेंच राज्यक्रांतीतून घेतले आहेत.

## समता

* समाजातील कोणत्याही घटकाला विशेष अधिकार नसणे आणि कोणताही भेदभाव न करता सर्वांना संधीची समान उपलब्धता असणे म्हणजे समता होय.

यासंदर्भात कलम 14 ते 18 नागरी समता सुनिश्चित करतात.

1. कायद्यापुढे समानता - कलम 14
2. धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मठिकाण या कारणावरून भेदभाव करण्यास प्रतिबंध - कलम 15
3. नोकऱ्यांत संधीची समानता - कलम 16
4. अस्पृश्यता निर्मूलन - कलम 17
5. पदव्या रद्द करणे - कलम 18

तसेच कलम 325 ⇒ धर्म, वंश, जात, लिंग या घटकामुळे कोणतीही व्यक्ती मतदार यादीत समाविष्ट होण्यास अपात्र ठरणार नाही. - राजकीय समता

कलम 326 ⇒ लोकसभा व विधानसभा निवडणुका प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वावर घेतल्या जातील. - राजकीय समता.

मार्गदर्शक तत्त्व कलम 39 ⇒ उपजीविकेच्या पुरेशा साधनांसाठी सर्व स्त्री पुरुषांना समान अधिकार आणि समान कामासाठी समान वेतन.

## बंधुत्व

- म्हणजे बंधुभाव. एकेरी नागरिकत्व पद्धतीतून बंधुत्वाला चालना.

देशाची एकता आणि एकात्मता हे शब्द बंधुभाव प्रदर्शित करतात.

## सरनामा → राज्यघटनेचा भाग

1. बेरुबारी युनियन खटला = 1960.

एखाद्या कलमाचा अर्थ लावण्यासाठी सरनाम्याची मदत घेता येऊ शकेल परंतु सरनामा हा राज्यघटनेचा भाग नाही.

Scanned by CamScanner

⇒ सार्वभौम राष्ट्र असल्याने भारत परकीय क्षेत्रे मिळवू शकतो.
उदा. दादरा नगर हवेली, गोवा, दमण व दीव, पुदुच्चेरी, सिक्किम.

१. कलम 2

कलम 2 ने संसदेला दोन अधिकार

* भारतीय संघात नवीन राज्यांना समाविष्ट करणे - अस्तित्वात असलेली
* नवीन राज्यांची स्थापना करणे. - अस्तित्वात नसलेली.

कलम 2 - भारतीय संघाचा भाग नसलेल्या राज्याच्या संदर्भात - (प्रवेश व स्थापना)

कलम 3 - संसदेचे अधिकार

1) कोणत्याही राज्यातून विशिष्ट क्षेत्र वेगळे काढून किंवा दोन किंवा अधिक राज्ये किंवा राज्यांचे भाग एकत्र करून नवीन राज्य बनवणे.
2) राज्याचे क्षेत्र वाढवणे
3) —॥— कमी करणे
4) राज्यांच्या सीमांत बदल करणे.
5) राज्यांचे नाव बदलणे.

कलम 3 मध्ये दोन अटी.
① वरील बदल करणाऱ्या प्रस्तावाचे विधेयक राष्ट्रपतींच्या पूर्व परवानगीनेच संसदेत सादर करणे.
② शिफारस करण्यापूर्वी राष्ट्रपती ते विधेयक राज्याचा दृष्टीकोन जाणून घेण्यासाठी राज्यविधिमंडळाकडे पाठवतील. (मात्र राज्य विधिमंडळाची मते राष्ट्रपतींवर बंधनकारक नाहीत.)
③ संसदेमध्ये प्रत्येक वेळी दुरुस्ती सुचवली व ती मान्य केली तर पुन्हा ते विधेयक राज्य विधीमंडळाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही (बाबूलाल विरुद्ध मुंबई राज्य - 1960)
④ संघराज्य प्रदेशाच्या संदर्भात विधिमंडळाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. - संसदेला अधिकार.

* भारत हा विनाशी राज्यांचा अविनाशी संघ आहे.
राज्य स्थापने किंवा सीमा व क्षेत्रे बदलण्याचा अधिकार संसदेला.
कारण - ① राज्य स्थापने किंवा सीमा व क्षेत्रे बदलण्याचा अधिकार संसदेला - राज्ये केंद्र किंवा संघ नष्ट करू शकत नाही.
② केंद्र राज्ये नष्ट करू शकते मात्र राज्ये केंद्र ...

अमेरिकेतील संघराज्य सरकार नवीन राज्य बनवू शकत नाही राज्यांच्या संमतीशिवाय सीमा बदलू शकत नाही त्यामुळे अमेरिका अविनाशी राज्यांचा अविनाशी संघ.

* कलम 2 व कलम 3 अंतर्गत केलेले कायदे ⇒ कलम 368 मध्ये येत नाही ⇒ कारण सर्वसाधारण बहुमत.
* कलम 3 अंतर्गत राज्याचे क्षेत्र कमी करण्याच्या अधिकारामध्ये भारतीय क्षेत्र परदेशाला देण्याच्या अधिकाराचा समावेश नाही. (सर्वोच्च न्यायालयाचा निकाल: प. बंगाल मधील बेरुबारी युनियन हे क्षेत्र पाकला देण्याच्या निर्णयाविरुद्ध (केंद्राच्या))
असे क्षेत्र देण्यासाठी कलम 368 नुसारच घटनादुरुस्ती करावी लागते. त्यानुसार वरील क्षेत्र 9 वी घटनादुरुस्ती 1960 नुसार पाकला देण्यात आले.
* भारत व इतर देश यांच्यातील सीमेबाबतचा विवाद सोडविण्यासाठी घटनादुरुस्ती आवश्यक नाही. असा निकाल - सर्वोच्च न्यायालय 1969.

Scanned by CamScanner

भारत व बांग्लादेशाच्या सीमांच्या संदर्भात:

१०० वी घटनादुरुस्ती २०१५ ⇒ भारताने — बांग्लादेशाला — ३ क्षेत्र } हस्तांतरीत केली.
बांग्ला — भारताला — ५१ क्षेत्र

या दुरुस्तीमुळे – परिशिष्ट १ मध्ये आसाम, प बंगाल, मेघालय, त्रिपुरा या चार राज्यांच्या क्षेत्राबाबतच्या तरतुदीत बदल.

## *राज्ये व संघराज्ये प्रदेश यातील बदल*

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय क्षेत्रातील ५५२ संस्थानांपैकी ५४९ संस्थाने भारतात विलीन झाले
तीन संस्थानाचा विरोध - १) हैद्राबाद २) जुनागड ३) जम्मू व काश्मीर

पुढे हैद्राबाद - पोलिस कारवाईने } भारतात विलीन.
जुनागड - सार्वमताने
जम्मू व काश्मीर - कराराने

१९५० मध्ये भारतीय संघात एकूण २९ राज्ये → चार प्रकारात वर्गीकरण ⇒ भाग ए, बी, सी, डी.

| भाग ए: गव्हर्नरांचे ९ प्रांत. | भाग बी - विधिमंडळे असलेली ९ संस्थाने. | भाग सी - मुख्य आयुक्तांचे केंद्रशासित प्रांत. | भाग-डी. |
|---|---|---|---|
| १) आसाम | १) हैद्राबाद | १) अजमेर | १) अंदमान आणि निकोबार |
| २) बिहार | २) जम्मू आणि काश्मीर | २) भोपाळ | |
| ३) बॉम्बे | ३) मध्य भारत | ३) बिलासपूर | |
| ४) मध्यप्रदेश | ४) म्हैसूर | ४) कूच बिहार | |
| ५) मद्रास | ५) पतियाळा व पूर्वपंजाब | ५) कुर्ग | |
| ६) ओरिसा | ६) राजस्थान. | ६) दिल्ली | |
| ७) पंजाब | ७) सौराष्ट्र | ७) हिमाचल प्र. | |
| ८) संयुक्त प्रांत | ८) त्रावणकोर कोचीन | ८) कच्छ | |
| ९) प. बंगाल | ९) विंध्य प्रदेश. | ९) मणीपूर | |
| | | १० त्रिपुरा. | |

## *दार आयोग आणि जेव्हीपी समिती*

* स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भाषावार प्रांतरचनेची मागणी (विशेषतः दक्षिणेकडून)
* जून १९४८ एस के दार यांच्या अध्यक्षतेखाली – भाषावार प्रांत आयोगाची स्थापना.

या आयोगाची भाषेच्या ऐवजी प्रशासकीय सोयीनुसार प्रांतांच्या पुनर्रचनेची शिफारस:
डिसें४८ ⇒ या निर्णयाने समाजात कटुता निर्माण :. या प्रश्नांचा पुनर्विचार करण्यासाठी जेव्हीपी समिती स्थापन - जे - जवाहरलाल - व्ही - वल्लभभाई, पी - पट्टाभी सितारामय्या.

एप्रिल १९४९ - अहवाल – राज्य पुनर्रचनेसाठी भाषा हा घटक अधिकृतरित्या अमान्य केला.

ऑक्टो १९५३ मध्ये मद्रास राज्यातून तेलुगु भाषिक क्षेत्र वेगळे काढून आंध्र या भाषेवर आधारित पहिल्या राज्याची निर्मिती: (जन आंदोलन व ५६ दिवस पोट्टी श्रीरामलु - काँग्रेस कार्यकर्त्याचे उपोषण व निधन)

Scanned by CamScanner

## * फाजल अली आयोग :

⇒ डिसें १९५३ मध्ये फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय राज्य पुनर्रचना आयोग

⇒ फाजल अली, के.एम. पणिक्कर, एच.एन. कुंझरु.

⇒ अहवाल १९५५ साली - भाषावार पुनर्रचना मान्य ⇒ मात्र एक भाषा — एक राज्य हा सिद्धांत नाकारला.

मूळ घटनेतील राज्यांचे ४ भागातील वर्गीकरण व १६ राज्ये व ३ संघराज्य प्रदेश ही व्यवस्था नाकारली.

⇒ फाजल आयोगाच्या शिफारशी काही बदल करून सरकारने स्विकारल्या व राज्य पुनर्रचना कायदा १९५६ केला.

७ वी घटनादुरुस्ती १९५६ ⇒ भाग A व भाग B यातील भेद नाहिसा केला. भाग C मधील राज्ये रद्द केली.

त्यामुळे १ नोव्हे १९५६ रोजी देशात १४ राज्ये व ६ संघराज्य प्रदेश निर्माण झाले.

भाग B मधील संस्थाने.
1. त्रावणकोर कोचीन — केरळ.
2. हैद्राबाद — आंध्र.
3. मध्य भारत, विंध्य — म. प्रदेश
4. सौराष्ट्र व कच्छ — मुंबई
5. कुर्ग — म्हैसूर
6. पतियाळा व पूर्व पंजाब — पंजाब
7. अजमेर, राजस्थान — राजस्थान
8. जम्मू आणि काश्मीर — जम्मू आणि काश्मीर.

### १९५६ मधील भारताचे क्षेत्र.

राज्ये ⇒
1) आंध्र प्र.
2) बिहार
3) आसाम
4) बॉम्बे
5) जम्मू आणि काश्मीर.
6) केरळ
7) म. प्रदेश
8) मद्रास
9) म्हैसूर
10) ओरीसा
11) पंजाब
12) राजस्थान
13) उ. प्रदेश
14) प. बंगाल.

केंद्रशासित प्रदेश.
1) दिल्ली
2) अंदमान आणि निकोबार बेटे.
3) हिमाचल प्रदेश
4) लक्षदिप, मिनिकॉय, अमनदिवी
5) मणिपूर
6) त्रिपुरा.

Scanned by CamScanner

# * १९५६ नंतर निर्माण झालेली नवीन राज्ये *

① **महाराष्ट्र आणि गुजरात :**

१९६० - मुंबई - द्विभाषिक प्रांताचे दोन भाग :
मराठी - महाराष्ट्र - मुंबई पासून
गुजराती - गुजरात → १५ वे राज्य.

② **दादरा आणि नगर हवेली -**

सत्ता पोर्तुगिजांची - १९५४ मध्ये पोर्तुगिजांपासून मुक्त
१९६१ पर्यंत निवडून दिलेल्या प्रशासकामार्फत प्रशासन
दहावी घटनादुरुस्ती १९६१ अन्वये केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा.

③ **गोवा दमण व दीव -**

सन १९६१ पोलीस कारवाईने पोर्तुगिजांकडून घेण्यात आले.
बारावी घटनादुरुस्ती १९६२ अन्वये केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा.

④ **पुदुच्चेरी -**

जुनी फ्रेंच वसाहत. (यामध्ये पुदुच्चेरी, कारईकल, माहे आणि यानम)
१९५४ मध्ये फ्रेंचानी भारताकडे सोपवले.
१९६२ पर्यंत अधिग्रहीत क्षेत्र म्हणून
चौदाव्या घटनादुरुस्तीने केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा - १९६२

⑤ **नागालँड -**

आसाममधील नागा टेकड्या व तुएनसांग क्षेत्र - नागा लोकांच्या
आंदोलनामुळे नागालँड ची - १९६३ स्थापना → १६ वे राज्य.

⑥ **हरियाना, चंदीगड, हिमाचल प्रदेश**

सन १९६६ - पंजाबचे विभाजन हरियाना हे राज्य - १७ वे राज्य
व चंदीगड ला केंद्रशासित प्रदेश
शाह आयोग - शिफारस - पंजाबी भाषिक - पंजाब.
} पंजाब पुनर्रचना अधिनियम १९६६
१९७१ - हिमाचल प्र या संघराज्य प्रदेशाला राज्याचा दर्जा १८ वे राज्य

⑦ **मणिपूर, त्रिपुरा, मेघालय**

१९७२ ⇒ नॉर्थ इस्ट फ्रांटियर एजन्सी (नेफा) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागातून
मणिपूर व त्रिपुरा या दोन संघराज्य प्रदेशांना व — १९ वे व २० वे
मेघालय या उपराज्याला राज्याचा दर्जा — २१ वे राज्य.
(१९६९ साली मेघालय आसाम राज्यांतर्गत स्वायत्त असलेले उपराज्य बनले होते)

⑧ **सिक्कीम :** सन १९४७ पर्यंत चोग्याल राजवटीखालील भारतीय संस्थान
१९५० नंतर भारताचे संरक्षित क्षेत्र. (संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, दळणवळण - भारत)
१९७४ - ३५ वी घटनादुरुस्ती - भारतीय संघातील सहयोगी राज्याचा दर्जा.
त्यासाठी कलम २ए व दहाव्या परिशिष्टाचा समावेश
१९७५ - मध्ये सार्वमत ⇒ १९७५ - ३६ व्या घटनादुरुस्तीने - सिक्कीम २२ वे राज्य.

Scanned by CamScanner

बनले तसेच घटनेच्या पहिल्या व चौथ्या परिशिष्टात दुरुस्ती करण्यात आली.

→ कलम ३७१ एफ घटनेत समाविष्ट

→ कलम २ए व परिशिष्ट १० रद्द.

९) मिझोराम, अरुणाचल प्रदेश, व गोवा :

सन. १९८७ → मिझो नॅशनल फ्रंट आणि केंद्र सरकार - मिझोराम शांतता करार.

मिझोराम संघराज्य क्षेत्राला पूर्ण राज्याचा दर्जा : ⇒ २३ वे

→ अरुणाचल प्रदेश : ७२ पासून संघराज्य क्षेत्र होते - २४ वे राज्य बनले.

→ गोवा, दमन आणि दिव पूर्वी संघराज्य क्षेत्र - गोवा २५ वे राज्य बनले.

१०) छत्तीसगड, उत्तराखंड, झारखंड :

सन २००० - छत्तीसगड — म. प्रदेशातून → २६ वे

उत्तराखंड — उ. प्रदेशातून → २७ वे

झारखंड — बिहारमधून → २८ वे

११) तेलंगणा

जून २०१४ - आंध्र प्रदेशातून तेलंगणा या २९ व्या राज्याची निर्मिती करण्यात आली.

हैद्राबाद ही राजधानी १० वर्षांसाठी दोन्ही राज्यांची असणार आहे.

पुढे आंध्र प्र. ने वेगळी राजधानी स्थापायची आहे.

आंध्र प्र उच्च न्यायालयाचे नाव हैद्राबाद उच्च न्यायालय : दोघांसाठी एकच

नावात बदल :

१९५० - संयुक्त प्रांत → उ. प्रदेश.

१९६९ - मद्रास → ता. नाडू

१९७३ - म्हैसूर → कर्नाटक

१९७३ - लॅकॉदिव, मिनिकॉय अमनदिवी → लक्षद्वीप

१९९२ - दिल्ली → दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्र (६९ वी घ. दु. १९९२)

२००६ — उत्तरांचल → उत्तराखंड

२००६ — पाँडिचेरी → पुदुच्चेरी

२०११ — ओरिसा → ओडिशा

कलमे: — २ए : सिक्कीम हे संघाचे सहयोगी राज्य : (रद्द)

— ४ — कलम २४३ संदर्भात परिशिष्ट १ व ४ मध्ये दुरुस्तीची तरतुद.

Scanned by CamScanner